MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

Jan. To March 2019
Issue-29, Vol-09



27

# गनिमी कावा : छत्रपती शिवाजी महाराजांची यशस्वी युध्दनीती

प्रा. डॉ. विष्णू रायभान पडवाल
इतिहास विभाग प्रमुख,
श्री शिवाजी विज्ञान व कला महा.
चिखली, जि. बुलडाणा

**********

प्राचीन काळापासुनच युध्दाची परंपरा चालत आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासाची सुरूवातच युध्दाने झाली आणि ती आजपर्यंत चालू असल्याचे सांगता येईल. कोणतेही युध्दे जिंकणे हे अंतिम उद्दिष्ट असले तरी ते प्राप्त करण्यासाठी निरनिराळया युध्द पध्दतीचा वापर करण्यात येत असल्याचे उल्लेख इतिहासात आहे. या युध्दनीतीची प्रत्यक्ष अम्मलबजावणी करण्यासाठी सभोवतालची परिस्थिती, भौगोलिक स्थिती व ऐतिहासिक पार्श्वभूमी, उपलब्ध साधन सामुग्री व सैन्य संख्या वर अवलंबून आहेत. या शिवाय साम, दाम, दंड व भेद अशी चतुर्विध युध्दनीती देखील प्राचीन काळापासून भारतास रूढ असल्याचे आढळून येते. मध्ययुगाच्या उत्तरार्धात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यांची स्थापना करण्याचे अचाट कार्य केले. कारण तत्कालीन भारताचा विचार करता संपूर्ण भारतभर यवनी सत्तेचा अंमल असतांना त्यांच्या विरूध्द जाऊन एक मराठी स्वराज्य सत्ता स्थापन करावी हा केवळ दैवी चमत्कारच मानावा लागतो. शिवकालीन युध्दनीतीचा किंवा लष्कराचा विचार करता महाराजांनी अल्पशा लष्करांच्या आधारावर स्वराज्याची निर्मिती केली. तत्कालीन दक्षिण व उत्तर भारतातील शत्रुंजवळ त्यांच्या लष्करापेक्षा जास्त होते. याशिवाय त्यांची क्षमता व धनसंपत्ती देखील जास्त होती. तरी सुध्दा महाराजांनी एका विशिष्ट पध्दतीने, युक्तीने सैन्याची व्युवरचना करित शत्रुंना ठिक ठिकाणी पराभुत केले व आपले वर्चस्व सिध्द केले. या महाराजांच्या युध्दनीतीला **गनिमी कावा** युध्दनीती असे म्हणतात. याच युध्दनीतीने महाराजांनी कमी संख्याबळ व साधनांची ऊणीव भरून काढल्याचे आढळुन येते. छत्रपती शिवाजी महाराजांची हिंदवी स्वराज्य स्थापन करतांना प्रामुख्याने आमलात आणलेल्या गनिमी कावा युध्दनीतीचा आढावा सदर शोध निबंधात घेण्याचा मी प्रयत्न खालील प्रमाणे करीत आहे.

**गनिमी कावा : अर्थ आणि भौगोलिक परिस्थिती:—**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अमलात आणलेल्या युध्दतंत्राचे स्वरूप विशद करण्यापूर्वी **गनिमी कावा** या शब्दाच्या मुळाशी असलेल्या संकल्पना, अर्थ इत्यादींची माहिति घेणे आवश्यक आहे. **गनिम** हा शब्द मुळातच फारसी भाषेतील असून गनिमी हे हया शब्दाचे षष्ठयंत रूप आहे. **कावा** या शब्दाचा अर्थ फसवणूक, धोकेबाजपणा, कपट असा आहे. यावरून असे म्हणता येईल की, शत्रुवर कपटयुक्त हल्ला किंवा कपट युध्द असा गनिमी कावा या संज्ञेचा अर्थ रूढ झाला आहे. महाराष्ट्राच्या शब्दकोषात कावा या शब्दाचे विविध अर्थ हयाप्रमाणे लुच्चेगिरी, गुप्त कट, हुलकावणी व पिछेहाट इत्यादी.

गनिमी कावा यामधील कावा या शब्दाचा वाच्यार्थ प्रथम देण्यात आला आहे तो याप्रमाणे “घोडयांची रग जिरविण्यासाठी त्यास घ्यावयास लावलेले फेरे, मंडले, घिरटी व फेर घोड भरधाव पळत असता त्याला वाटेल तसा वळविले, फिरविणे, मंडळाकार आणणे, पुढे.मागे भरधाव सोडणे इत्यादी”. या ठिकाणी असे सांगता येईल की, “यामुळे घोडयाबरोबर शत्रुची रग जिरविणे सहज शक्य होत”.

**गनिमी कावा युध्द नीतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी:—**

गनिमी कावा या युध्द पध्दतीचा अभ्यास करतांना या ठिकाणी आपल्याला याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा व भौगोलिक स्थितीचा आढावा घ्यावा लागले. कारण की कोणत्याही घटनेला त्या मागची पार्श्वभूमी महत्वाची असते. महाराजांबरोबर, नंतरच्याही मराठा शासकांनी हया युध्दपध्दतीचा वापर स्वराज्य रक्षण व मराठा साम्राज्यविस्तारासाठी केला होता. त्यामुळे



Scanned with CamScanner